**Q.P. Code :02484**

**[वेळ : २½ तास]** **[गुण : ७५]**

Please check whether you have got the right question paper.

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

**प्र.१** भरताच्या नाट्यशास्त्रातील स्थायीभावावर आधारित रसकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

'ध्वनि हाच काव्याचा आत्मा असतो' हा विचार आनंदवर्धनाच्या विवेचनाच्या आधारे स्पष्ट करा.

**प्र.२** रसास्वादाविषयीच्या श्रीशंकुकाच्या मीमांसेची चर्चा करा. **१५**

**किंवा**

काव्यातील रसास्वादाचे स्वरूप भट्टनायकाच्या मीमांसेच्या आधारे उलगडून दाखवा.

**प्र.३** 'शब्दशक्ती' ही संकल्पना स्पष्ट करून लक्षणा व व्यंजना या दोन शक्तींचे काव्यार्थाच्या निर्मितीतील महत्त्व विशद करा. **१५**

**किंवा**

छंद व मुक्तछंद यांच्यातील फरक सांगून कवितेच्या घडणीतील त्यांच्या योगदानाची चर्चा करा.

**प्र.४** व्युत्पत्ती व अभ्यास या दोन काव्यकारणांची स्वरूपवैशिष्ट्ये विशद करा. **१५**

**किंवा**

साहित्यप्रयोजन म्हणजे काय ते सांगून भारतीय साहित्यशास्त्रातील विविध काव्यप्रयोजनांची चर्चा करा.

**प्र.५ (अ)** पुढीलपैकी **कोणत्याही पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. **१०**

**(१)** 'शब्दार्थो संहितौ काव्यम्' ही काव्यव्याख्या कोणी केली आहे?
**(२)** कुंतक वक्रोक्तीचे किती प्रकार सांगतो?
**(३)** वामनाने मानलेले रीतीचे प्रकार कोणते?
**(४)** 'उपचित स्थायी म्हणजेच रस' हा सिद्धांत कोणी मांडला?
**(५)** लक्षणेच्या कोणत्याही दोन प्रकारांची नावे लिहा.
**(६)** कोणत्याही दोन वृत्तांची नावे लिहा.
**(७)** भारतीय साहित्यशास्त्रात शक्ती व प्रतिभा या वेगळ्या असल्याचे कोणी मानले आहे?
**(८)** भरताने सांगितलेल्या कोणत्याही दोन काव्यप्रयोजनांची नावे लिहा.

**पुढे पहा**



munotes.in
1CBDC0EC913EBB98E9ACF1860C584F72

**Q.P. Code :02484**

**प्र.५ (आ)** पुढील प्रश्नांची योग्य उत्तरे देलेल्या पर्यायांतून निवडून लिहा. **०५**

**(१)** 'औचित्यविचार' कोणी मांडला आहे?
(अ) राजशेखर (आ) क्षेमेंद्र (इ) वामन (ई) भरत

**(२)** 'वाक्यं रसात्मकं काव्यं' ही काव्यव्याख्या कोणी केली आहे?
(अ) विश्‍वनाथ (आ) आनंदवर्धन (इ) अभिनवगुप्त (ई) मम्मट

**(३)** 'रति' या स्थायीभावाचा रस कोणता?
(अ) हास्य (आ) करुण (इ) वीर (ई) शृंगार

**(४)** अभिनवगुप्ताने किती रसविघ्ने सांगितली आहेत?
(अ) सात (आ) आठ (इ) नऊ (ई) सहा

**(५)** 'अशुभनिवारण' या काव्यप्रयोजनाचा निर्देश कोणी केला आहे?
(अ) भरत (आ) मम्मट (इ) रुद्रट (ई) दण्डी

-----------------------------------

munotes.in



1CBDC0EC913EBB98E9ACF1860C584F72